आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
९ मे २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम बंगालमध्ये भाजपा नेते शुभेन्दु अधिकारी यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

- तामिळनाडूमध्ये सत्ता स्थापनेचा दावा करण्यासाठी अभिनेते जोसेफ विजय पुन्हा राज्यपालांकडे

- देशात अल्पसंख्यक असुरक्षित असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी फेटाळला

- देशाच्या संरक्षण दल प्रमुखपदी निवृत्त लेफ्टनंट जनरल एन एस राजा सुब्रमणी यांची तर नौदलप्रमुख म्हणून व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन यांची नियुक्ती

आणि

- उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक नियमांच्या उल्लंघन प्रकरणी क्रिकेटपटू यशस्वी जयस्वाल, शेफाली वर्मा आणि कुस्तीपटू विनेश फोगटला नोटीस

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे भाजपचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शुभेंदु अधिकारी यांनी आज शपथ घेतली. कोलकात्यातल्या ब्रिगेड परेड मैदानात एका भव्य समारंभात राज्यपाल आर.एन. रवी यांनी अधिकारी यांना राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्र्यांसह दिलीप घोष, अग्निमित्रा पॉल, अशोक किर्तनिया, निशित प्रामाणिक आणि खुदिराम तुडू या पाच कॅबिनेट मंत्र्यांनी देखील या वेळी शपथ घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शहा आणि इतर केंद्रीय मंत्री तसंच भाजप-एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री या कार्यक्रमाला हजर होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे दोन्ही उपमुख्यमंत्री शपथविधीला हजर होते.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या सर्व विरोधी पक्षांनी भाजपाविरोधात एकत्र येत संयुक्त व्यासपीठ उभारण्याचं आवाहन तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी केलं. यासंबंधी कोणत्याही राजकीय पक्षाला संवाद साधायचा असेल तर त्यासाठी आपण तयार असल्याचंही बॅनर्जी यांनी स्पष्ट केलं.

भाजपला विरोध करणाऱ्या विविध संलग्न विद्यार्थी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनाही त्यांनी एकत्र येण्याचं आवाहन केलं.

<><><><><>

तामिळनाडूमध्ये अभिनेते आणि टीव्हीके पक्षाचे प्रमुख जोसेफ विजय यांनी सत्ता स्थापनेसाठी आज पुन्हा राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी १२० आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र सादर केलं. काँग्रेसचे ५, माकप, भाकप, व्हीसीके, इंडियन युनियन मुस्लीम लीग या पक्षांचे प्रत्येकी २ अशा १२० आमदारांचा त्यांना पाठिंबा मिळाला आहे. या पक्षांचे नेतेही आज त्यांच्यासोबत होते.  बहुमतासाठी त्यांना ११८ सदस्यांच्या पाठिंब्याची गरज आहे. विजय यांना सरकार स्थापन करता यावं आणि तामिळनाडूत राष्ट्रपती राजवट लागू नये यासाठी हा पाठिंबा दिल्याचं व्हीसीके पक्षाचे प्रमुख थोल थिरुमावलवन म्हणाले.

दरम्यान केरळमध्ये विधीमंडळ पक्षनेत्याच्या संदर्भात काँग्रेसचा निर्णय अजून झालेला नाही. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी याबाबत निर्णय घेतील असं पक्षाच्या प्रभारी दीपादास मुन्शी यांनी सांगितलं.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालयाने पंजाबचे उद्योगमंत्री संजीव अरोरा यांना अटक केली आहे. आज ईडीने त्यांच्या कार्यालय आणि निवासस्थानी मिळून ५ ठिकाणी छापे टाकले,  त्यावेळी अरोडा यांनी तपासात सहकार्य केलं नाही, असं ईडीचं म्हणणं आहे. यापूर्वी देखील संजीव अरोडा यांच्या आस्थापनांवर ईडीने २ वेळा छापे टाकले होते. त्यात काहीही सापडलं नव्हतं, केवळ राजकीय हेतूनं ही कारवाई झाल्याचं पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

देशात संविधानानुसार सर्व समुदाय एकसमान आहेत असे सांगत अल्पसंख्यक नागरिक असुरक्षित असल्याचा आरोप केंद्रीय अल्पसंख्यक मंत्री किरेन रीजीजू यांनी फेटाळून लावला आहे. देशातले आणि देशाबाहेरचे भारताचे शत्रू हा गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पारशी समुदायानं भारतासाठी दिलेल्या योगदानाच्या संदर्भात आयोजित परिषदेत ते मुंबईत आज बोलत होते.

**- - होल्ड - रीजीजू बाइट - - -**

पारशी समुदायाने मोठ्या प्रमाणात दानधर्म केला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय खेळाडू सहभागी झालेल्या पहिल्या दोन ऑलिम्पिकचा सर्व खर्च पारशी नागरिकांनी उचलला होता, याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली. पारशी समुदायातल्या नागरिकांची संख्या कमी होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली.

**<><><><><>**

निवृत्त लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची देशाचे पुढील सीडीएस अर्थात संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे सीडीएस, जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी संपत आहे. याच दिवशी जनरल एन. एस. राजा सुब्रमणी, पदभार स्वीकारतील आणि संरक्षण मंत्रालयाच्या लष्करी व्यवहार विभागाचे सचिव म्हणूनही काम पाहतील. लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी १ सप्टेंबर २०२५ पासून राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार आहेत.

व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन् यांची नौदलाचे आगामी प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या नौदलाच्या पश्चिम विभागाचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ म्हणून कार्यरत आहेत. त्यांना नौदलात कार्यान्वयन, सामरिक आणि कर्मचारी व्यवस्थापन पदांवर जवळपास चार दशकांचा अनुभव आहे. सध्याचे नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी येत्या ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

**<><><><><>**

ग्रामीण भागात विधायक कार्य करणाऱ्या पंचायतीराज संस्थासाठीचे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार योजनेत ३४ आणि नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार विभागात ८ अशा एकूण ४२ पंचायतींची निवड पुरस्कारासाठी झाली असून येत्या ३ जून रोजी नवी दिल्लीत हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले जातील. कर्नाटकमधल्या सर्वाधिक ६ पंचायतींना पुरस्कार जाहीर झाला असून आंध्र प्रदेश आणि ओदिशातल्या प्रत्येकी ५ पंचायतींची निवड झाली आहे.

महाराष्ट्रातल्या ४ ग्रामपंचायतींना यंदा पुरस्कार मिळाला आहे. भंडारा जिल्ह्यातल्या इटगाव पंचायतीला बालक स्नेही पंचायत म्हणून एक कोटी रुपयांचा तर नाशिक जिल्ह्यातल्या निंबाळे पंचायतीला सुशासनासाठीचा ७५ हजार रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

रायगड जिल्ह्यातल्या खारीवली पंचायतीला जल आत्मनिर्भरतेसाठी एक कोटी रुपये तर चांभार्ली ग्रामपंचायतीला सामाजिक न्याय आणि सामाजिक सुरक्षेसाठी साडेसदतीस लाख रुपयांचा पुरस्कार मिळणार आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष थांबवण्यासाठी अमेरिका आपल्या १४ कलमी प्रस्तावर इराणच्या प्रतिसादाची वाट पाहत असल्याचं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी म्हटलं आहे. इराणच्या प्रतिसादावरच वाटाघाटींची पुढची दिशा ठरेल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिकेनं लष्करी कारवाया करून तणाव वाढवला असून, राजनैतिक प्रयत्नांना खीळ घातली असल्याची टीका इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास आराघची यांनी केली आहे.

इस्रायलनं देखील दक्षिण लेबनॉनविरोधातली कारवाई सुरूच ठेवली असून, हिजबुल्लाच्या तळांना लक्ष्य केलं आहे.

<><><><><>

यशस्वी जयस्वाल आणि शेफाली वर्मा या भारतीय क्रिकेटपटूंनी आपल्या वास्तव्याची माहिती वेळेवर न दिल्यानं, उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक नियमांचं उल्लंघन झालं असल्याबद्दल नाडा अर्थात राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक संस्थेनं दोन्ही खेळाडूंना नोटीस बजावली आहे. संघटनेचे अधिकारी गेल्या वर्षी १७ डिसेंबर रोजी यशस्वी जयस्वाल याची आणि ७ नोव्हेंबर रोजी शेफाली वर्मा हिची चाचणी घेण्यासाठी गेलेले असताना, हे दोन्ही खेळाडू त्यांनी दिलेल्या पत्त्यावर आढळले नाहीत असं या नोटीशीत म्हटलं आहे. या संदर्भात दोन्ही क्रिकेटपटूंना उत्तर देण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली असून, याबाबत माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेलाही कळवण्यात आलं आहे. नाडाच्या नियमांनुसार, १२ महिन्यांच्या कालावधीत सलग तीन वेळा अशी चूक झाली तर त्या खेळाडूवर ४ वर्षांपर्यंतच्या बंदीची कारवाई होऊ शकते.

<><><><><>

भारतीय कुस्ती महासंघानं महिला कुस्तीपटू विनेश फोगट हिला शिस्तभंग आणि उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक नियमांच्या उल्लंघनाप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

यासोबतच निवृत्तीनंतर पुन्हा पुनरागमन करणाऱ्या खेळाडूंसाठी युनायटेड वर्ल्ड रेसलिंगनं आखून दिलेल्या नियमांनुसार सहा महिन्यांचा अनिवार्य नोटीस कालावधी पूर्ण न केल्यामुळं, तिला २६ जून २०२६ पर्यंत सर्व देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी महासंघानं अपात्र ठरवलं आहे.

विनेश हीनं १८ डिसेंबर २०२५ रोजी तिने आपली उत्तेजक द्रव्य चाचणी चुकवल्याची नोंद आंतरराष्ट्रीय चाचणी संस्थेनं केली असल्याचं महासंघानं या नोटिशीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत सध्या जयपूरमध्ये गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरू आहे. राजस्थाननं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा गुजरातच्या ७ षटकात बिन बाद ९२ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**